GovernmentofMaharashtra
**State Council of Educational Research & Training, Maharashtra**
SadashivPeth, Kumthekar Road,
Pine - 411030
Phone :(020) 24476938, 24475571
Website :-www.maa.ac.in

महाराष्ट्र शासन
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड,
पुणे -४११ ०३०
दूरध्वनी :-(०२०) २४४७६९३८, २४४७५५७१
वेबसाईट :-www.maa.ac.in
ई-मेल :- equitydept@maa.ac.in

जा.क्र/रा.शै.सं.प्र.प/समता/OoSC/२०२०-२०/2250 दि. १०/११/२०२०

# परिपत्रक

**वाचा :-**

१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९
२) सरल प्रणाली, शासन निर्णय दि.३ जुलै २०१५.
३) जा.क्र/मप्राशिप/सशिअ/हं.नि.व./२०१५-१६/२६४३ दि.०१/१०/२०१५.
४) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ३२१६/(९४/२०१६) प्रशिक्षण दि.०१ सप्टेंबर २०१६.
(समुह साधन केंद्र स्तरावर दरमहा शिक्षण परिषदेच्या आयोजनाबाबत)
५) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण.२०१७/प्र.क्र.(१७१/१७)एसडी-६ दि.०२ जूंन २०१८.
(विद्यार्थी सुरक्षा संदर्भात मार्गदर्शक सूचना)
६) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2019/प्र.क्र.42/एस.डी.-४. दि.६ जून २०१९.
(सर्व शैक्षणिक संस्थामध्ये तंबाखूमुक्त शाळा धोरण राबविण्याबाबत)
७) जा.क्र./मराशैसंप्रप/समता/शिक्षण हमीकार्ड/२०१९/४१८९ दि.२३/१०/२०१९
८) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण.२०२०/प्र.क्र.८६/एसडी-६ दि.१५ जून २०२०
९) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण.२०२०/प्र.क्र.८६/एसडी-६ दि.२४ जून २०२०
१०) मा.अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त दि.२० ऑगस्ट २०२०.
११) जा.क्र.मप्राशिप/समग्र शिक्षा/प्रमा/SMC/२०२०-२१/१७१२ दि.२८ ऑगस्ट २०२०.
१२) जा.क्र./मप्राशिप/समग्र शिक्षा/पशि/OoSC/२०२०-२१/१७५०दि०४सप्टेंबर२०२०
१३) जा.क्र/मप्राशिप/सशिअ/हं.नि.व./२०२-२१/२११७ दि.२६/१०/२०२०

**विषय :-** समग्र शिक्षा अंतर्गत Special Training for age appropriate admission of Out of School Children (OoSC) उपक्रमासंदभीतील सर्व समावेशक मार्गदर्शक सुचनांबाबत.

बालकांच्या मोफत आणि सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, राज्यात दि.१ एप्रिल २०१० रोजी कार्यन्वित झाला आहे. सदर कायद्यांतर्गत ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास दर्जेदार शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे. सर्व मुलांना शाळेच्या प्रवाहात आणून त्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शासनस्तरावरून विविध प्रयत्न केले जात आहेत. तरीही सद्यस्थितीत १०० टक्के मुले अनेक कारणांमुळे शिक्षणाच्या प्रवाहात नाहीत.

राज्याची भौगोलिक स्थिती व पर्जन्यमानातील असमतोलामुळे काही भागांमध्ये उदरनिर्वाहासाठी हंगामी स्वरूपाचे स्थलांतर होत आहे. रोजंदारीसाठी राज्यातील काही भागामधून कुटुंब राज्याबाहेर व राज्यांतर्गत स्थलांतर करतात. ऊसतोडणी बरोबरच वीटभट्टी, दगडखाण, कोळसाखाणी, शेतमजूर, बांधकाम व्यवसाय, सार्वजनिक बांधकाम, रस्ते, नालेदुरुस्ती व बांधकाम जिनिंग मिल इत्यादी अनेक प्रकारच्या कामांसाठी अनेक कुटुंब साधारण सप्टेंबर नंतर स्थलांतर करत असल्यामुळे त्या कुटुंबामधील मुलांच्या नियमित शिक्षणात बाधा येऊन अनेक शैक्षणिक प्रश्न निर्माण होतात. तसेच सद्यस्थितीत जागतिक

महामारीच्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे सर्वच विद्यार्थ्यांच्या नियमित शिक्षणामध्ये बाधा निर्माण झाली आहे. शाळा बंद असल्यामुळे ग्रामीण भागात शाळांचे COVID सेंटर मध्ये रूपांतर करण्यात आलेले आहे. राज्यातील अनेक शाळा क्वारंटाईन सेंटर बनल्या आहेत. Covid मुळे पालकांच्या स्थलांतराचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेकांना रोजगार उपलब्ध नाही. मुलेसुद्धा कुटुंबांसमवेत स्थलांतरित झाल्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत मुलांच्या शैक्षणिक हक्कांचे नुकसान होऊ नये यासाठी प्रत्येक शाळेने कृती कार्यक्रम तयार करून स्थलांतरित कुटुंबाची माहिती घेऊन पूर्व नियोजन करून स्थलांतरित मुलांसाठी शिक्षण हमी कार्ड देण्याची प्रक्रिया राबवावी जेणेकरून मुलांच्या अध्ययन निष्पत्ती कितपत साध्य झाल्या आहेत हे समजेल आणि पाठपुरावा करणे शक्य होईल.

राज्यात शाळाबाह्य मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी स्वंयप्रेरणेने अनेक शिक्षक बालरक्षक म्हणून नाविन्यपूर्ण पद्धतीने काम करत आहेत. शाळाबाह्य, वयानुरूप प्रवेशित व स्थलांतरीत मुलांच्या शिक्षणाला अधिक गती येण्यासाठी तसेच याकामी सुसूत्रता येण्यासाठी राज्यस्तरावरून सर्वच जिल्ह्यासाठी सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

**अ) Covid-19 च्या पार्श्वभूमीवर वयानुरूप प्रवेशित/स्थलांतरित/नियमित मुलांच्या शिक्षणाबाबत राज्यस्तरावरून सुरु असलेले प्रयत्न -**

१) राज्यातील प्राथमिक शाळामध्ये वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्फत ऑनलाइन प्रशिक्षणाचे आयोजन सप्टे २०२० मध्ये करण्यात आले होते. वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु राहावे म्हणून भाषा, गणित, इंग्रजी, हिंदी विषयांचे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात आले. प्राथमिक शाळेतील वयानुरुप प्रवेशित विद्यार्थ्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत मराठी व उर्दू माध्यमातून मराठी, हिंदी, इंग्रजी व गणित या विषयाच्या विद्यार्थी मित्र पुस्तिका तयार करण्यात आलेल्या आहेत तसेच शिक्षकांसाठी शिक्षक हस्तपुस्तिकाही तयार करण्यात आलेल्या आहे. या सर्व पूरक शैक्षणिक साहित्याचा शिक्षकांनी covid-19 च्या कालावधीत विद्यार्थ्यांना ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने शिकविण्यासाठी उपयोग करावा.

२) **"शाळा बंद.......पण शिक्षण आहे"** या उपक्रमांतर्गत दैनिक अभ्यासमालेद्वारा पालकांच्या मदतीने प्रत्येक मुलाला अभ्यास देणे सुरु असून शिक्षण यंत्रणेतील सर्व घटकांकडून हा संदेश प्रत्येक पालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या अंतर्गत खालीलप्रमाणे विविध उपक्रम सुरु आहेत.

i) इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व वर्गाच्या सर्व विषयाच्या अध्ययनाच्या संधी सह्याद्री वाहिनीवरील टिलीमिली या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

ii) "गोष्टींचा शनिवार" हा उपक्रम सर्वांपर्यंत पोहचविण्यात येत आहे.

iii) दीक्षा पोर्टल च्या माध्यमातून विविध प्रकारचे अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत.

iv) विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन व समुपदेशन मिळण्यासाठी MAHAACAREER PORTAL ची उभारणी करण्यात आली आहे.

v) GOOGLE CLASSROOM च्या माध्यमातून शिक्षकांसाठी online प्रशिक्षण देण्यात येत आहे.

vi) "मैत्री करूया विज्ञान गणिताशी" या कार्यक्रमात विज्ञानाचे विविध सोपे पण मनोरंजक प्रयोगांचे प्रात्यक्षिक दाखवले जात आहे.

vii) जिल्ह्यातील शिक्षण परिषदांमध्ये सर्व राज्यस्तरीय उपक्रमांबाबत यंत्रणेतील सर्व घटकांचे नियमित उदबोधन व चर्चा करण्यात यावी.

३) स्थलांतरीत मुलांचे शिक्षण :-

१. स्थलांतराच्या प्रश्नासंदर्भात स्थानिक परिस्थितीचा विचार करून प्रत्येक शाळेने संभाव्य स्थलांतरित मुलांची यादी तयार करणे, गृह भेटी देणे, स्थलांतर रोखण्यासाठी प्रयत्न करणे, शिक्षण हमी कार्ड देणे आदी बाबी कराव्यात.

२. प्राधान्याने स्थलांतर थांबविण्यासाठी वारंवार गृहभेटी देऊन उदबोधन करावे.

३.काही कारणास्तव पालाकासोबत मुलांचे स्थलांतर होत असेल अशा वेळी शिक्षण हमी कार्डचा वापर करावा परंतु त्यासोबत वैयक्तिक दूरध्वनी संपर्काच्या माध्यमातून स्थलांतरित विद्यार्थ्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

५. Dropbox मधील मुलांची संख्या कमी करण्यासाठी पर्यवेक्षीय यंत्रणेने समन्वय साधून योग्य कार्यवाही करणे.

६. स्थलांतरित होऊन आलेल्या अथवा गेलेल्या मुलांच्या पालकांचे समुपदेशन करणे तसेच संभाव्य स्थलांतरित मुलांना शिक्षण हमी कार्ड देण्याची कार्यवाही जबाबदारीने करावी व त्याची नोंद सरल प्रणालीवर करावी.

७. सरल प्रणालीवर स्थलांतरित मुलांची माहिती भरणे व त्यानुसार मुलांचे Tracking करणे. पालकांच्या स्थलांतरामुळे किंवा इतर कारणामुळे विद्यार्थी शिकत असलेल्या शाळेत उपलब्ध असलेल्या शेवटच्या वर्गापर्यंत शिक्षण न घेता पुढील शिक्षणासाठी एका शाळेतून दुसऱ्या शाळेत जातात. अशा विद्यार्थ्यांची भरलेली माहिती दुसऱ्या शाळेत Online Transfer होणे आवश्यक आहे. यासाठी सरल प्रणाली अंतर्गत असणाऱ्या Student Portal मध्ये Student Transfer करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

४) covid-19 च्या कालावधीतील बालकांची सुरक्षितता –

सद्यस्थितीत covid-१९ या जागतिक महामारी रोगाच्या प्रादुर्भावामुळे सर्वच विद्यार्थ्यांच्या नियमित शिक्षणामध्ये बाधा निर्माण झाली आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव विद्यार्थ्यांना शाळेपासून दूर राहावे लागत आहे. मुलांच्या शिक्षणा इतकीच त्यांची सुरक्षाही महत्वाची आहे. यासाठी राज्यस्तरावरून बालहक्क व सुरक्षिततेविषयी विविध कायद्यांची व इतर बाबींची माहिती बालहक्क व सुरक्षितता या ऑनलाईन प्रशिक्षणातून देण्यात आली. YouTube live च्या माध्यमातून या प्रशिक्षणासाठी राज्यातून एकाच वेळी १,२०,००० शिक्षक सहभागी होते. प्रशिक्षणानंतरही प्रशिक्षणाचे व्हीडीओ पालक, विद्यार्थी, शिक्षणप्रेमी नागरिक व शिक्षक अशा एकूण २३ लाख ४५ हजार ७३८ व्यक्तींनी पाहिल्याचे दिसून येते. बालकांचे हक्क व सुरक्षितता याबाबतची मार्गदर्शक पुस्तिका राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून तयार करण्यात आली आहे. शिक्षण यंत्रणेतील सर्व घटकांनी प्रशिक्षणात मिळालेल्या माहितीचा व पुस्तिकेचा योग्य उपयोग करून मुलांच्या सुरक्षिततेबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

**ब) वरील सर्व मार्गदर्शक सूचनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे.**

| अ.क्र | विषय | जबाबदार विभाग | करण्याची कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | शाळाबाह्य मुलांचा आढावा घेण्यासाठी मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण विभागातील अधिकारी व इतर विभागातील | शिक्षण संचालनालय (प्राथमिक) | जिल्हास्तरीय समित्यांची वेळोवेळी बैठक घेवून शाळाबाह्य/स्थलांतरित मुलांच्या शोध मोहिमेबाबत आढावा घेणे. |